# प्रेस नोट

दि.१३/०९/२०१८

**लोकसेवक श्री.मनोहर अशोक मोरे, पोलीस कॉन्स्टेबल बक्कल नं.२५१२, नेमणुक श्रीरामपूर तालुका पोलीस स्टेशन, श्रीरामपूर, जि.अहमदनगर यांनी ५,०००/— रुपयाची लाच मागणी केलेवरुन गुन्हा दाखल.**

प्रस्तुत बातमीतील हकिगत अशी की, तक्रारदार यांनी लोकसेवक श्री.मनोहर अशोक मोरे, पोलीस कॉन्स्टेबल बक्कल नं.२५१२, नेमणुक श्रीरामपूर तालुका पोलीस स्टेशन यांचे विरुध्द लाच मागणीची तक्रार नोंदविली. त्यानुसार दि.५/७/२०१८ व दि.९/७/२०१८ रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई करण्यात आली. त्यामध्ये तक्रारदार यांचे मुलाचे भांडणाचे प्रकरण मिटविण्यासाठी लोकसेवक श्री.मनोहर अशोक मोरे, पोलीस कॉन्स्टेबल बक्कल नं.२५१२, नेमणुक श्रीरामपूर तालुका पोलीस स्टेशन यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन स्वतःचा सांपत्तीक फायदयासाठी तक्रारदार यांचेकडे पंच साक्षीदारासमक्ष ५,०००/— रुपये लाचेची मागणी केली म्हणुन लोकसेवक श्री.मनोहर अशोक मोरे, पोलीस कॉन्स्टेबल बक्कल नं.२५१२, नेमणुक श्रीरामपूर तालुका पोलीस स्टेशन यांचे विरुध्द श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे गुरनं.२०१/२०१८ ला.प्र.का.क.७ प्रमाणे दि.१३/९/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लोकसेवक श्री.मनोहर अशोक मोरे, पोलीस कॉन्स्टेबल बक्कल नं.२५१२, नेमणुक श्रीरामपूर तालुका पोलीस स्टेशन यांना दि.१३/९/२०१८ रोजी सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर युनिटने केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सर्व सामान्य जनतेला आवाहन करण्यात येते की, त्यांना कोणी शासकिय नोकर,पदाधिकारी शासकिय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी करत असेल तर त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर येथे श्री.किशोर चौधरी, पोलीस उप अधीक्षक यांचेशी संपर्क साधावा. त्यासाठी १०६४ हा निशुल्क टोल फ्रि नंबर सुरु करण्यात आलेला आहे.

| | |
|---|---|
| कार्यालयाचा पत्ता | **पोलीस उप अधीक्षक कार्यालय,जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर** |
| **फोन नंबर** | ०२४१—२४२३६७७ |
| **टोल फ्रि नंबर** | १०६४ |

पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक वभाग,
अहमदनगर

Scanned by CamScanner